दैनिक
# विश्वजगत

RNI No:- MAHMAR/2023/86213
https://epaper.dainikvishwajagat.in



मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185
E-mail : dainikvishvjagato101@gmail.com

■ बुलडाणा ■ वाशिम ■ अकोला ■ अमरावती ■ यवतमाळ ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ परभणी ■ जालना ■ नाशिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ जळगाव खान्देश ■ धुळे ■ रायगड ■ ठाणे ■ पुणे ■ सातारा ■ नांदेड

सोमवार दिनांक 16 मार्च 2026 वर्ष : 4 थे अंक : 290 वा पाने : 4 किंमत : 5 रूपये

# इराणने इस्रायलवर सेजिल बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले

## या युद्धात पहिल्यांदाच वापरले गेले; 2500 किमीपर्यंत लक्ष्य भेद करू शकते

**वृत्तसंस्था : दैनिक विश्वजगत**

तेल अवीव/तेहरान अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचा आज 17 वा दिवस आहे. इराणने रविवारी या युद्धात पहिल्यांदाच इस्त्रायलवर 'सेजिल बॅलिस्टिक क्षेपणास्त्र' डागले.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) ने सांगितले की इस्त्रायलच्या लष्करी आणि संरक्षण सुविधांना लक्ष्य करण्यात आले आहे. हे घन इंधनावर चालणारे सामरिक क्षेपणास्त्र आहे, जे 2000-2500 किलोमीटरपर्यंत हल्ला करू शकते.

दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी काल सांगितले की, इराणने ना युद्धविरामाची मागणी केली आहे ना अमेरिकेशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. जोपर्यंत गरज असेल तोपर्यंत इराण स्वतःचे संरक्षण करत राहील.

सीबीएस न्यूजला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, इराण या संघर्षातून मागे हटणार नाही. जोपर्यंत ट्रम्प हे बेकायदेशीर युद्ध आहे हे मान्य करत नाहीत, तोपर्यंत इराण प्रत्युत्तर देत राहील.

युद्धाच्या दरम्यान यूएईने ३५ जणांना अटक करण्याचे आदेश दिले, ज्यात १९ भारतीय आहेत. पीटीआय वृत्तसंस्थेनुसार, त्यांच्यावर सोशल मीडियावर फेक व्हिडिओ आणि माहिती पसरवल्याचा आरोप आहे.

यूएईचे ॲटर्नी जनरल डॉ. हमद सैफ अल शम्स यांनी सांगितले की, हे पाऊल डिजिटल प्लॅटफॉर्मच्या निगराणीनंतर उचलण्यात आले आहे, जेणेकरून खोटी माहिती पसरवून अशांतता किंवा भीती निर्माण करण्यापासून रोखता येईल.



### गॅसअभावी मेस बंद होण्याची वेळ

नागपूर : पश्चिम आशियात पेटलेल्या इराण-इस्त्रायल युद्धाचे पडसाद आता थेट नागपूरकरांच्या ताटात उमटू लागले आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीत गॅसवाहू जहाजे अडकल्याने शहरात घरगुती आणि व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. याचा सर्वाधिक फटका शहरातील शेकडो घरगुती खानावळी आणि डब्बा पुरवठा करणाऱ्यांना बसत असून, अनेकांवर व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. शहरातील अनेक ग्राहकांनी सिलिंडरसाठी बुकिंग केले आहे. मात्र, कंपन्यांकडून बुकिंग नॉट कन्फर्म किंवा साठा नसल्याचे उत्तर मिळत आहे.

# संकटात भारताकडूनच शेजारी देशाला मदतीचा हात

## बांगलादेशला तब्बल 40 हजार टन इंधनाचा पुरवठा करणार

**वृत्तसंस्था : दैनिक विश्वजगत**

बांगलादेश ने भारताकडून अतिरिक्त ४०,००० टन डिझेल आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हा पुरवठा एप्रिल पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. बांगलादेश पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे अधिकारी Md. Murshed Hossain Azad याने सांगितले की, अलीकडे भारताकडून ५,००० टन डिझेल बांगलादेशमध्ये पोहोचला आहे आणि मार्चच्या मध्यापर्यंत अशीच आणखी एक खेप येण्यास आहे.

४०००० अतिरिक्त डिझेल पुरवठा

अधिकाऱ्यांनी सांगितले की, भारताकडून ४०,००० टन अतिरिक्त डिझेल आयात करण्याचा प्रस्ताव मिळाला आहे. एलसी (लेटर ऑफ क्रेडिट) आणि इतर औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर हे इंधन एप्रिलपर्यंत बांगलादेशमध्ये पोहोचेल. भारत आणि बांगलादेश यामध्ये पूर्वी डिझेल रेल्वे वॅगनद्वारे पाठवले जात असे. परंतु मार्च २०२३ मध्ये सुरू झालेल्या Bangladesh–India Friendship Pipeline मुळे पुरवठा अधिक जलद झाला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन बांग्लादेशाचे प्रधानमंत्री शेख हसीना आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्तपणे केले होते.

या पाईपलाइनद्वारे भारताच्या Numaligarh Refinery Limited (आसाम) कडून बांग्लादेशच्या पार्वतीपूर डेपोपर्यंत पोहोचवला जातो. हा प्रकल्प दोन्ही देशांमधील ऊर्जा सहकाराचा एक मोठा उदाहरण मानला जातो. रिपोटनुसार, अंतरिम सरकारच्या काळात पाईपलाइनमधून डिझेल आयात काही काळासाठी थांबवण्यात आले होते. परंतु नवीन सरकार येण्याच्या नंतर अलीकडे ५,००० टन डिझेलच्या खेपसह पुरवठा पुन्हा सुरू केला आहे. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे बांग्लादेशमध्ये काही काळासाठी पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी दिसून आली.

सरकारने खरेदीवर नियंत्रण ठेवण्यासाठी इंधन विक्रीवर राशनिंग लागू केले होते, जे आता काढण्यात आले आहे जेणेकरून लोक ईदच्या आधी सोयीने प्रवास करू शकतील. होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूकीवर इराणने निर्बंध लादले



असल्याने अनेक देशांमध्ये इंधनाची तुटवडा जाणवत आहे. दरम्यान भारताच्या दोन जहाजांनी अलिकडेच होर्मुझ सामुद्रधुनीतून गुजरातच्या दिशेने मार्गक्रमण केले आहे. त्यामुळे येत्या काळात भारतात होणारी वाहतूक सुरळीत होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# चिखलीतील जयस्तंभ चौकात भीषण आग

## 'हांडगे मामा कचोरी सेंटर'सह 5–6 दुकाने जळून खाक



**अजय टप : दैनिक विश्वजगत**

मलकापूर :बुलडाणा जिल्ह्यातील चिखली शहरातील गजबजलेल्या जयस्तंभ चौक आणि बॉम्बे मार्केट परिसरात रविवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना घडली. अवघ्या काही मिनिटांत आगीने रौद्ररूप धारण केल्याने परिसरातील ५ ते ६ छोटी-मोठी दुकाने जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दुकानदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवार (१५ मार्च २०२६) रोजी दुपारी सुमारे ३.५० वाजण्याच्या सुमारास जयस्तंभ चौक परिसरातील एका दुकानातून अचानक धूर निघताना दिसला. दुपारची वेळ असल्याने परिसरात नागरिकांची मोठी वर्दळ होती. काही क्षणातच आगीने भीषण रूप धारण करत शेजारील दुकानांनाही आपल्या विळख्यात घेतले. आगीची तीव्रता इतकी होती की धुराचे मोठे लोट आकाशात दूरवरूनही दिसत होते.







या आगीत शहरातील अत्यंत लोकप्रिय असलेले 'हांडगे मामा कचोरी सेंटर' पूर्णपणे जळून खाक झाले. तसेच फळ विक्रेत्यांच्या गाड्या, बुटांच्या व चपलांच्या दुकानातील मोठा साठा, तसेच मोबाईल रिपेअरिंग दुकानातील ग्राहकांचे मोबाईल व दुरुस्तीचे साहित्यही आगीत भस्मसात झाले. त्यामुळे अनेक लहान व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.घटनेची माहिती मिळताच चिखली नगर परिषदेचे अग्निशमन दल, पोलीस विभाग आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या गाड्यांनी पाण्याचा मारा करत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. परिसरातील तरुण आणि नागरिकांनीही जीवाची पर्वा न करता मदत केल्याने आग आणखी पसरण्यापासून रोखण्यात यश आले.

प्रशासनाकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी पोलीस व संबंधित विभागांकडून अधिकृत तपास सुरू आहे.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार श्वेताताई महाले पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. नुकसानग्रस्त दुकानदारांशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्या म्हणाल्या, "अनेक कुटुंबांची कष्टाची कमाई काही क्षणात जळून खाक झाल्याचे पाहून मन खूप व्यथित झाले आहे. ही अत्यंत वेदनादायक घटना आहे. नुकसानग्रस्त दुकानदारांना शासनाकडून योग्य मदत मिळवून देण्यासाठी मी पूर्ण प्रयत्न करेन." तसेच त्यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर लागलेल्या या आगीमुळे चिखली शहरात हळहळ व्यक्त केली जात असून नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### बॉम्बे मार्केट आगीत नुकसानग्रस्तांची आमदार श्वेता महाले पाटील यांच्याकडून पाहणी

चिखली शहरातील बॉम्बे मार्केट परिसरात लागलेल्या भीषण आगीच्या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार श्वेताताई महाले पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. आगीत जळून गेलेल्या दुकानांची आणि झालेल्या नुकसानीची पाहणी करताना त्यांनी नुकसानग्रस्त दुकानदारांशी संवाद साधून त्यांची व्यथा ऐकून घेतली. घटनेत अनेक लहान व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून काही क्षणात अनेक कुटुंबांची कष्टाची कमाई जळून खाक झाल्याचे पाहून त्या भावूक झाल्या. यावेळी बोलताना आमदार श्वेता महाले पाटील म्हणाल्या, "त्या ठिकाणी झालेलं नुकसान पाहून मन खूप व्यथित झालं. अनेक कुटुंबांची कष्टाची कमाई काही क्षणात जळून खाक झाली, ही खूप वेदनादायक बाब आहे." तसेच नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदत मिळावी यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

१ २ ३ ४ ५ ६

# इराण युद्ध अमेरिकेला जड जात आहे?

इराण अमेरिका युद्धाला आता पंधरा दिवस होत आले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. ज्या वेळी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ला करून इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी यांची हत्या केली तेंव्हा इराण आणि इस्त्रायल या देशांनी दावा केला की आम्ही इराणच्या सर्वोच्च नेत्याला संपवून टाकल्याने इराण लवकरच आम्हाला शरण येईल आणि अवघ्या काही तासात किंवा फार फार तर दोन ते तीन दिवसांत हे युद्ध संपेल. जगालाही तसेच वाटले होते कारण अमेरिका आणि इराण यांची तुलनाच होऊ शकत नाही. अमेरिकेची शस्त्र सज्जता पाहिल्यास इराण त्यांच्यापुढे नगण्यच आहे त्यात अमेरिकेला इस्त्रायलची साथ त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपवून अमेरिका स्वत:चे मनसुबे पूर्ण करेल असेच सर्वांना वाटले होते पण झाले उलटेच. आयातूला खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणने अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवले. इराणने अमेरिका इस्त्रायलला त्यांच्याच भाषेत उत्तर देऊन या दोन्ही देशांना जेरीस आणले. इतक्यावरच इराण थांबला नाही तर इराणने ज्या आखाती देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ला करुन ते नष्ट केले आणि अमेरिकेला हिसका दाखवला. इराण अमेरिकेचा इतका कडवा प्रतीकार करेल असे कोणालाही वाटले नव्हते खुद्द ट्रम्प यांनाही तसे वाटले नव्हते पण आता त्यांना त्याची जाणीव झाली असावी म्हणूनच ते आता युद्ध थांबवण्याची भाषा करत आहे. हे युद्ध अपेक्षेपेक्षा जास्त लांबले त्यामुळे ट्रम्प यांच्यावर अमेरिकेतूनही टीका होऊ लागली आहे. त्यात इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने या समुद्राधुनीमार्गे जगात होणारा इंधन पुरवठा थांबल्याने अनेक देशांनी रशियाकडून इंधन विकत घेतले

रशियाने चढ्या दरात इंधनविक्री सुरू केली त्यामुळे रशियाच गब्बर होऊ लागली. याचाच अर्थ इराण अमेरिका युद्धाचा खरा लाभार्थी रशिया ठरला. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ म्हणतात ते यालाच. भारतासह अनेक देशांनी रशियाकडून इंधन खरेदी करू नये यासाठी टेरीफ लावून ब्लॅकमेल करणाऱ्या ट्रम्प यांनाच त्या देशांना रशियाकडून इंधन खरेदी करा असे सांगावे लागले एकप्रकारे ट्रम्प यांचा हा अपमानच आहे. हे युद्ध जितके लांबेल तितकी त्याची जगाला किंमत मोजावी लागेल. या युद्धाचे परिणाम जगातील अनेक देशांवर होऊ लागले आहे. अनेक देशात गॅस आणि इंधन तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस आणि इंधन तुटवड्यामुळे सर्वसामान्यांच्या जगण्यामरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे युद्ध अमेरिकेने लादले असल्याने जगभर ट्रम्प यांचा निषेध व्यक्त केला जात आहे. खुद्द अमेरिकेतही ट्रम्प यांचा मोठ्या प्रमाणात निषेध व्यक्त व्यक्त होत आहे. ट्रम्प यांच्या निषेधासाठी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरत आहे. एकीकडे ट्रम्प यांचा निषेध केला जात असतानाच दुसरीकडे इराणच्या प्रति जगाची सहानुभूती वाढत चालली आहे. एकूणच हे युद्ध ट्रम्प यांना जड जात असून आता हे युद्ध लवकरात लवकर संपवण्याची त्यांची मानसिकता बनली आहे. अर्थात इराण याला सहजासहजी संमती देईल असे वाटत नाही त्यामुळे ट्रम्प यांनी हे युद्ध लवकर संपेल असे म्हटले असले तरी तसे होईलच असे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही.

**श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे

# लोकाभिमुख प्रशासन हीच खरी जवाबदारी

# उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे!

**अनिल दराडे : दैनिक विश्वजगत**

सिंदखेडराजा :सिंदखेडराजा : प्रशासन हे केवळ कागदोपत्री कामकाजापुरते मर्यादित नसून ते लोकांच्या अपेक्षांशी जोडलेले असावे, असे प्रतिपादन सिंदखेडराजा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी केले.प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता, जबाबदारी आणि जनतेप्रती संवेदनशीलता असणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्परतेने काम करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



लोकांच्या समस्या वेळेवर सोडवणे, त्यांच्या अपेक्षा समजून घेणे आणि प्रशासन व नागरिक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जनतेच्या सहभागातून प्रशासन अधिक प्रभावी व लोकाभिमुख बनू शकते, असेही ते म्हणाले. यावेळी उपस्थितांनी प्रशासनाने अशा प्रकारे जनतेशी थेट संवाद साधून समस्या सोडवण्याच्या भूमिकेचे स्वागत केले.

**प्रश्न : सिंदखेडराजा उपविभागात दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला. या काळाकडे आपण कसे पाहता ?**

प्रा. खडसे : दोन वर्षांचा हा काळ माझ्यासाठी खूप महत्त्वाचा ठरला. पदभार स्वीकारल्यानंतर प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर त्वरित उपाय करण्याचा प्रयत्न केला. या काळात नागरिकांचा विश्वास मिळवणे हेच सर्वात मोठे यश वाटते.

**प्रश्न : या आव्हानांचा सामना कसा केला ?**

प्रा. खडसे : येथे महसूली, सामाजिक आणि स्थानिक प्रश्नांची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे संयम आणि योग्य नियोजन या दोन गोष्टींचे भर दिला. तलाठी, मंडळ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी सातत्याने संवाद साधून टीमवर्कच्या माध्यमातून प्रशासनाची गती वाढवण्याचा प्रयत्न केला.

**प्रश्न : सिंदखेडराजा उपविभाग प्रशासनाच्य दृष्टीचा आव्हानात्मक मानला जातो.**

प्रा. खडसे : माझ्या मते प्रशासनाने लोकांशी संवाद ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आम्ही कार्यालयात येरणाऱ्या प्रत्येक नागरिकाची समस्या संयमाने ऐकून आणि शक्य तितक्या लवकर त्यावर तोडगा काढणे हा माझा प्रयत्न असतो. प्रशासनाने माणुसकी जपली तर नागरिकांचा विश्वास आपोआप मिळतो.

**प्रश्न : विद्यार्थ्यांसाठी दाखले मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ केल्याचे सांगितले जाते.**

प्रा. खडसे : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी वेळेत दाखले मिळणे भवितव्यासाठी अत्यंत गरजेचे असते. एखाद्या दाखल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होऊ शकते. त्यामुळे दाखले हवे असलेल्या प्रक्रियेची अधिक जटील आणि पारदर्शक करण्यावर आम्ही भर दिला आहे.

**प्रश्न : अवैध रेती उत्खननावर नियंत्रणासाठी कोणती उपाययोजना उचलली ?**

प्रा. खडसे : अवैध उत्खननामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होतो. त्यामुळे खडकपुरण धरण परिसरातील अवैध हालचालीवर कारवाई करण्यात आली. तसेच अवैध प्रवेश रोखण्यासाठी धरण परिसरात तीन प्रतिबंधात्मक गेट बसविण्यात आले. या उपाययोजनांमुळे अवैध कामकाजावर नियंत्रण ठेवण्यास मदत झाली.

**प्रश्न : निवडणुकांच्या काळातील अनुभव कसा होता ?**

प्रा. खडसे : लोकसभा, विधानसभा आणि नगर परिषद निवडणुका या मोठ्या जबाबदाऱ्या असतात. काटेकोर नियोजन आणि संपुर्ण प्रशासनाच्या सहकार्यामुळे निवडणुका सुलभीत पार पडल्या. उपविभागाने जिल्ह्यात सर्वत अगोदर निकाल जाहीर करण्याचा मान मिळविला.

**प्रश्न : सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आपले प्राधान्य काय असते ?**

प्रा. खडसे : महसूल प्रशासन अधिक पारदर्शक आणि गतिमान करणे, नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कारवाई करणे आणि अवैध कामकाजावर नियंत्रण ठेवणे यावर पुढील काळतही भर देणार आहोत. प्रशासनाचा मानवी चेहरा अधिक बळकट करण्याचा आमचा प्रयत्न सुरू राहील.

**प्रश्न : नागरिकांसाठी काही संदेश ?**

प्रा. खडसे : नागरिकांनी आपल्या समस्या प्रशासनासमोर मोकळेपणाने मांडाव्यात. प्रशासन त्यांच्या सोबत अत्यंत गरजेचे असते. एखाद्या दाखल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होऊ शकते. प्रशासनाने समाजाशी उशिरा मिळाल्यास न्याय देण्यासाठी सदैव तत्पर आहे.

**प्रश्न : पुढील काळासाठी आपले प्राधान्यक्रम काय असतील ?**

प्रा. खडसे : महसूल प्रशासन अधिक पारदर्शक आणि गतिमान करणे, नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कारवाई करणे आणि अवैध कामकाजावर नियंत्रण ठेवणे यावर पुढील काळतही भर देणार आहोत. प्रशासनाचा मानवी चेहरा अधिक बळकट करण्याचा आमचा प्रयत्न सुरू राहील.

# नवीन पिढीला अध्यात्माकडे वळविण्यासाठी 'टॉकिंग गजानन विजय ग्रंथाची' निर्मिती

**केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचे प्रतिपादन**

**ना. गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या जगातील पहिल्या 'राजराजेश्वरी' या 'टॉकिंग श्री गजानन विजय ग्रंथ'चे लोकार्पण**

**पोथी विराजमान असलेल्या पालखीने भक्तिमय वातावरण**

**'जय गजानन श्री गजानन'च्या जयघोषाने सभागृह दुमदुमले**

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

नागपूर : लोकप्रबोधन, लोकशिक्षण, लोकसंस्कार अत्यंत आवश्यक आहे. यातून समाज घडत असतो. आजच्या पिढीला पुस्तक वाचायला वेळ नाही. अश्यात या पिढीला अध्यात्माकडे वळविण्यासाठी, त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानचा वापर आवश्यक आहे. त्याच प्रेरणेतून 'टॉकिंग गजानन विजय ग्रंथाची' निर्मिती झाली. आता तरुण पिढीने या ग्रंथाचे पठण करणे अपेक्षित आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी केले.

संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित जगातील पहिला 'बोलणारा' श्री गजानन विजय ग्रंथ (Talking Book) चे लोकार्पण ना. श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. सुरेश भट सभागृहात आयोजित या सोहळ्यास मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती मा. श्री. जयंत म्हैसकर, संतनगरी शेगाव येथील मा. श्री. शैलेंद्र महादेव (गणेश) पाटील, जेजुरी खंडोबा देवस्थान संस्थेचे अध्यक्ष श्री. मंगेश घोणे तसेच डोंबिवली येथील सौ. विद्याताई पडवळ यांची विशेष उपस्थिती होती. आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार विकास कुंभारे, माजी आमदार सुधाकर कोहळे, जयप्रकाश गुप्ता, उमेश महाजन, संजय जैन, गिरीश देशमुख, शाम पेठकर अमर इंदुरकर यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती.



ना. श्री. गडकरी म्हणाले, '11 वर्षांपासून आम्ही खासदार सांस्कृतिक महोत्सव करतो. अनेक कार्यक्रम झालेत. गजानन महाराजांच्या जीवनावरील नाटकही झाले. गेल्या काही वर्षांपासून भक्ती महोत्सव देखील होत आहे. मोठा प्रतिसाद मिळतो. मनाचे श्लोक, वंदे मातरम् आणि भगवत गीतेच्या पठणाचे विक्रम केलेत. ज्येष्ठांच्या जीवनात आनंद पेरण्यासाठी देखील अनेक उपक्रम. भजन स्पर्धा देखील घेतली. पाच हजार भजन मंडळींना भजन साहित्य वितरित केले.' शैलेंद्र पाटील म्हणाले, आजच्या आधुनिक जगात हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे. नवीन पिढीला हे कार्य नक्कीच आकर्षित करेल.' विद्याताई पडवळ म्हणाल्या, 'हा ग्रंथ म्हणजे आधुनिक काळातील आविष्कार आहे. गजानन वीणा या यंत्राच्या साहाय्याने पोथीमधील प्रत्येक सूर सद्गुरूंनी केली असते. त्यानुसार अनुभवता येणार आहे. कोणत्या भक्तांकडून कोणती सेवा कधी करून घ्यायची याची योजना हे कार्य नितीन गडकरी यांच्या हातून घडले आहे. पुढची पिढी आपल्याप्रती कृतज्ञ राहील.'

### यांचा विशेष गौरव

गडकरी कुटुंबियांच्या वतीने स्नुषा सौ. ऋतुजा गडकरी आणि नात कावेरी यांनी सत्कार स्वीकारला. तर निर्मितीमध्ये योगदान असलेले शाम पेठकर, वीरेंद्र लाटणकर, महेश तिवारी, उमेश चारोके, संजय मोरे, अजय बिवडे, महेंद्र पेंढारकर, देवेंद्र दोडके यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. विदर्भाच्या विविध भागांतून आलेले गजानन भक्त दास भार्गव महाराज, राजेंद्र शेगोकार, पुंडलिकराव देशमुख, दीपक कऱ्हाडे, अमित घीनमीने, मेधा भास्करवार, संजय कनोजे, नानासाहेब कांडलकर, हेमंत नरहर शेट्टीवार, अंजली दंडे, मनोज बावनकर आणि संजय देशमुख यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक गिरीश देशमुख यांनी केले.

### पाच भक्तांना मिळाला ग्रंथ

कार्यक्रम स्थळी उपस्थित झालेल्या गजानन भक्तांसाठी एक विशेष योजना आम्ही आखली आहे. तिथे आलेल्या प्रत्येक भक्ताकडून त्यांची माहिती भरून घेण्यात आली. कार्यक्रमातच त्यामधून ईश्वर चिठ्ठी द्वारे निघालेल्या पाच भाग्यवान गजानन भक्तांना पाहुण्यांच्या हस्ते हा अद्भुत ग्रंथ महाराजांचा प्रसाद म्हणून भेट देण्यात आला. यामध्ये मयुरेश केणे, सुजाता खबाटा, अपर्णा तेलपांडे, कल्पना वझलवार आणि पूजा बोडखे यांचा समावेश आहे.



### ग्रंथाची वैशिष्ट्ये

- ५०० पानांचा भव्य व आकर्षक ग्रंथ
- गजानन वीणा' या विशेष यंत्राच्या सहाय्याने संपूर्ण ग्रंथ मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये ऐकण्याची सुविधा
- श्री गजानन विजय ग्रंथातील २१ अध्याय सुरेल धूनमध्ये संगीतबद्ध
- प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी भक्तिमय २१ भजने
- महाराजांच्या लीलांचे दर्शन घडविणारी सुमारे २५० सुंदर व भावस्पर्शी चित्रे
- प्रत्येक अध्यायाचे सोप्या भाषेत निरूपण आणि बोध
- मोबाईल ॲप —डाउनलोड करून कुठेही व कधीही ग्रंथ ऐकण्याची सुविधा
- मल्टीसेंसर तंत्रज्ञानाचा उपयोग

### ग्रंथ निर्मितीचे शिलेदार

या ग्रंथाची निर्मिती इंस्टाग्रोथ मर्चेंडाइज एलएलपी या संस्थेमार्फत करण्यात आली आहे.
या प्रकल्पात संजय जैन, गिरीश देशमुख, अमर इंदुरकर आणि उमेश महाजन यांचे विशेष योगदान आहे.
ग्रंथाचे लेखन व क्रिएटिव्ह डायरेक्शन श्री. श्याम पेठकर व सौ. भाग्यश्री पेठकर यांनी केले आहे.
संगीत विरेंद्र लाटणकर यांनी दिले असून संगीत नियोजन पवन तिवारी यांनी केले आहे.
चित्रांकन उमेश चारोके आणि संजय मोरे यांनी केले आहे.
निर्मिती व्यवस्थापन अजय बिवडे यांनी सांभाळले आहे.

मंगेश घोणे म्हणाले, 'आजची पिढी मोबाईलमध्ये व्यस्त आहे. अशावेळी मोबाईलमध्येच महाराजांचे चरित्र वाचता येईल, अशी योजना करण्यात आली.

# बेपत्ता व्यक्तींची संख्या वाढली

नागपूर: देशातील बेपत्ता व्यक्तींच्या वाढत्या संख्येवर आणि मानवी तस्करीच्या गंभीर परिस्थितीवर राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने कडक पावले उचलली आहेत. बिहार, ओडिशा, तेलंगण, महाराष्ट्र आणि राजस्थान या पाच राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि पोलीस महासंचालकांना आयोगाने नोटिसा बजावल्या असून,



दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. ९ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका मीडिया रिपोर्टची दखल घेत आयोगाने ही 'सुमोटो' (स्वत:हून) कारवाई केली आहे. या रिपोर्टनुसार, २०१३ पासून बिहारमध्ये दरवर्षी १२ ते १४ हजार बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांची नोंद होत आहे. यामध्ये मुलांचे प्रमाण मोठे असून, दुर्दैवाने केवळ दोन तृतीयांश मुलांचाच शोध लागण्यात यश आले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार, ओडिशा, बिहार, तेलंगणा आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये मानवी तस्करीच्या सर्वाधिक केसेस नोंदवल्या गेल्या आहेत. अल्पवयीन मुलांच्या तस्करीमध्ये ओडिशा अव्वल स्थानी असून त्यापाठोपाठ बिहारचा क्रमांक लागतो. तर, अल्पवयीन मुलींच्या तस्करीमध्ये राजस्थान आघाडीवर असल्याचे समोर आले आहे. आयोगाने म्हटले आहे की, जर मीडिया रिपोर्टमधील तथ्ये खरी असतील, तर हा मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन करण्याचा प्रकार आहे. अनेक उपाययोजना करूनही बेपत्ता व्यक्तींच्या संख्येत वाढ होणे आणि त्यांचा शोध न लागणे ही चिंतेची बाब आहे, असं आयोगाने म्हटलं आहे.

VISHWA JAGAT -Printed & Published by GAJANAN RAJARAM KATE Printed at GAJANAN Printers : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.)1 and Published at VISHWA JAGAT Office : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.) Editor GAJANAN RAJARAM KATE Mob.No.9096873185 RNI No:- MAHMAR/2023/86213

विश्वजगत हे पत्र मालक, प्रकाशक, गजानन राजाराम काटे यांनी मुद्रक गजानन प्रिंटींग प्रेस, मुद्रण स्थळ FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून मुद्रित करून - कार्यालय : विश्वजगत कार्यालय,FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून प्रकाशित केले. संपादक : गजानन राजाराम काटे मो. 9096873185 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतील. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार कार्यकारी संपादक जबाबदार राहतील.) सर्व वाद विवाद अकोला न्यायालयांतर्गत राहील.) Email : dainikvishvjagato101@gmail.com RNI No:- MAHMAR/2023/86213

महत्त्वाचे

## शिवतीर्था'वर राज ठाकरेंची तोफ धडाडणार



महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या उलथापालथीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पारंपरिक गुढीपाडवा मेळावा यंदा विशेष चर्चेत आला आहे. मुंबईतील ऐतिहासिक शिवतीर्थावर होणाऱ्या या सभेचा अधिकृत टीझर मनसेकडून सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.मनसेने शेअर केलेला हा टीझर अत्यंत आक्रमक आणि थेट आहे. यात सर्वसामान्य महाराष्ट्राच्या मनातील खदखद मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. टीझरमध्ये जनतेला काही बोचरे प्रश्न विचारले आहेत:

रोजच्या राजकीय घडामोडी पाहून मनस्ताप होतोय?

राज्याची ही अवस्था पाहून तुम्ही अस्वस्थ आहात का?

या प्रश्नांच्या माध्यमातून मनसेने सर्वसामान्य जनतेच्या मनातील संताप ओळखून त्यांना तुम्ही एकटे नाही आहात.

, साऱ्या महाराष्ट्राला असेच वाटतेय अशी साद घातली आहे. उज्वल महाराष्ट्र घडवण्यासाठी शिवतीर्थावर भेटूया असे आवाहन या व्हिडीओद्वारे करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वीच रायगडावर झालेल्या मनसेच्या 20 व्या वर्धापनदिनी राज ठाकरेंनी कार्यकर्त्यांना संबोधित केले होते. त्यावेळी जे काही बोलायचे आहे, ते गुढीपाडव्याच्या सभेतच बोलेन असे सूचक विधान राज ठाकरेंनी तेव्हा केले होते. त्यामुळे या मेळाव्यात ते काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मेळाव्यातून मनसेचा बदलेला राजकीय रंग आणि हिंदुत्वाची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# महादेवसिंह रावळ यांच्या निधनाबद्दल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची सांत्वन भेट

अजय टप : दैनिक विश्वजगत

मलकापूर : माजी नगराध्यक्ष हरिश रावळ यांचे वडील स्वर्गीय महादेवसिंह चंद्रसिंह रावळ यांच्या निधनामुळे रावळ कुटुंबावर शोककळा पसरली आहे. या दुःखद प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ (बंटी दादा) यांनी रावळ यांच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले.

यावेळी त्यांनी माजी नगराध्यक्ष हरीश रावळ तसेच त्यांच्या कुटुंबीयांमध्ये डॉ. आकांक्षा हरीश रावळ, आदित्य रावळ आणि सौ. वंदना रावळ यांना धीर देत दिवंगत महादेवसिंह रावळ यांना श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी डॉ. अरविंद कोलते, प्रा. खर्चे सर,अतिक जवारीवाले, अनिल गांधी, रावसाहेब देशमुख, ॲड. माजीद कुरेशी, ॲड. काजी साहेब, सोपान भाऊ शेलकर, दत्ताभाऊ काकास, तुळशीराम नाईक, माजी नगराध्यक्ष हाजी रशीद खान जमादार, रईस जमदार, जावेद कुरेशी, जाकीर मेमन, शहजाद खान, साजिद खान यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिवंगत महादेवसिंह रावळ यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.



# लोणवडी ग्रामपंचायतीतील रस्ता ठरावाच्या तारखेची चौकशी करण्याची मागणी

अजय टप : दैनिक विश्वजगत

मलकापूर : तालुक्यातील लोणवडी ग्रामपंचायतीच्या वॉर्ड क्रमांक ३ मधील रस्ता ११ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आला त्या करण्यात आलेल्या ठरावाच्या तारखेची व संबंधित्याच्या स्वाक्षऱ्यांनिशा चौकशी करण्यात यावी,अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे युवा तालुका प्रमुख अमोल बावस्कार यांनी ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत लोणवडी अंतर्गत वॉर्ड क्रमांक ३ मध्ये १५ व्या वित्त आयोगातून रस्ता कामासाठी ११ डिसेंबर २०२५



करण्यात आला त्या केलेल्या रस्त्या ठराव ची तारीख तसेच संबंधित सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांबाबत सविस्तर माहिती घेऊन त्याची चौकशी करावी.तसेच ग्रामपंचायत स्तरावर नियमांच्या बाहेर जाऊन मनमानी कारभार होत असल्याचा आरोप करत, यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई



निवेदन

प्रती,

ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर पंचायत समिती मलकापूर

विषय:- वार्ड नंबर 3 मधील 11 डिसेंबर रोजी करण्यात आलेल्या रस्ता ठराव तारखेची चौकशी करण्याबाबत

अर्जदार:- अमोल बावस्कार युवा तालुका प्रमुख प्रहार जनशक्ती पक्ष 9767201043

माननीय महोदय,

वरील विषयास अनुसरण विनंती अर्ज सादर करण्यात येत आहे की ग्रामपंचायत लोणवडी अंतर्गत वॉर्ड नंबर 3 मधील 15 वित्त आयोगातील 11 डिसेंबर 2025 रोजी रस्ता करण्यात आलेल्या रस्त्याची ग्रामपंचायत यांनी घेतलेल्या ठरावाची त्या तारखेची संबंधितांच्या स्वाक्षरी निशा योग्य माहिती घेण्यात यावी नियमाच्या बाहेर मनमानी कारभार करणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही आपणास नम्र विनंती..

Amol
आपला नम्र
अमोल बावस्कार

दि 12-03-2026

प्रतिलिपी

1)ग्राम विकास मंत्री महाराष्ट्र राज्य

2)जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बुलडाणा

O/C 12/3/26

प्रवर्ग लिपीक
पंचायत समिती,मलकापूर.
जि.बुलडाणा.

करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. याबाबत प्रशासनाने योग्य चौकशी करून सत्यता तपासावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# 'खेळ व योगशिक्षण' पुस्तकात श्रीनिवास जोशी यांची प्रस्तावना

संजय कडोळे: दै.विश्वजगत

कारंजा (लाड) : जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथील प्रसिद्ध 'सौ.रजनीताई देशमुख महाविद्यायातील प्रा.डॉ.दिनेश तांदळे यांनी लिहिलेल्या 'खेळ व योगशिक्षण' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवार दि. 12 मार्च रोजी असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. विद्यार्थी जीवनात खेळाचे व योगाभ्यासांचे महत्त्व विशद करणाऱ्या या पुस्तकात सखोल अभ्यासपूर्वक मांडणी केलेली दिसून येते. विशेष म्हणजे या पुस्तकाला आयएसबीएन क्रमांक मिळाला आहे.तांदळे यांची समाजसेवा



भडगाव आणि आसपासच्या परिसराला परिचित आहे.अनेक होतकरू,गरीब विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केलेली आहे. आणि विविध सामाजिक उपक्रमांचे सदैव आयोजन करून त्यात ते सक्रिय सहभागी असतात.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बीएससी.तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमावर आधारित हे पुस्तक आहे.या पुस्तकाला कारंजातील जे.डी.चवरे विद्यामंदिराचे प्राचार्य तथा लेखक,कवी,गीतकार श्रीनिवास राघवेंद्र जोशी यांची प्रस्तावना लाभली आहे.आपल्या प्रस्तावना लेखनाचे श्रेय त्यांनी सर्व कारंजावासीयांना समर्पित केले आहे. असे वृत्त महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यीक लोककलावंत तथा जुने जाणते पत्रकार संजय कडोळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवीले आहे.

# श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीचा स्तुत्य उपक्रम; गुढीपाडव्यानिमित्त शिर्डीत भव्य शिधा वाटप

## मा. सौ. धनश्रीताई विखे यांच्या शुभहस्ते होणार शुभारंभ; शिर्डीत दिग्गज मान्यवरांची व प्रशासकीय अधिकाऱ्यांची मांदियाळी

तुषार महाजन : दै.विश्वजगत

शिर्डी- मराठी नववर्षाची सुरुवात आणि गुढीपाडव्याच्या (२०२६) मंगल पर्वावर 'श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी' यांच्या वतीने एका भव्य शिधा वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा स्तुत्य उपक्रम सोमवार, दिनांक १६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०६.०० वाजता 'साईउद्यान इमारत परिसर' येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

मान्यवरांची प्रमुख उपस्थिती व शुभहस्ते वाटप: या समाजोपयोगी कार्यक्रमाचा शुभारंभ रणरागिणी महिला मंडळ, लोणीच्या अध्यक्षा मा. सौ. धनश्रीताई विखे मॅडम यांच्या शुभहस्ते होणार आहे.

याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री गोरक्षजी गाडीलकर साहेब (भा. प्र.से.), शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मा. सौ. जयश्रीताई थोरात मॅडम, शिर्डी नगरपरिषदेचे उप नगराध्यक्ष मा. श्री अभयभैय्या शेळके पा., साईबाबा संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री भिमराजजी दराडे साहेब आणि राहाता येथील सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक मा. श्री नामदेवजी ठोंबळ साहेब हे उपस्थित राहणार आहेत.

साईबाबा संस्थानच्या अधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती: या कार्यक्रमाला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे अनेक महत्त्वाचे अधिकारी देखील उपस्थित राहून शोभा वाढवणार आहेत. यामध्ये कार्यकारी अभियंता तथा प्रशासकीय अधिकारी मा. श्री बी. डी. दाभाडे साहेब, प्रशासकीय अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी मा. श्रीमती मंगल वराडे मॅडम,



प्रशासकीय अधिकारी मा. श्री संदिपकुमारजी भोसले साहेब, प्रशासकीय अधिकारी मा. श्रीमती प्रज्ञा महांडुळे मॅडम, संरक्षण अधिकारी तथा पोलीस निरीक्षक मा. श्री रोहिदासजी माळी साहेब आणि प्रशासकीय अधिकारी मा. श्री अतुलजी वाघ साहेब यांची सन्मानीय उपस्थिती असणार आहे.

आयोजक व संचालक मंडळाचे परिश्रम: या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी 'श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी' चे संपूर्ण संचालक मंडळ विशेष परिश्रम घेत आहे. संस्थेचे चेअरमन श्री विठ्ठल तुकाराम पवार पा. आणि व्हाईस चेअरमन श्री पोपट भास्कर कोते पा. यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडत आहे.

यावेळी संचालक मंडळातील सर्व सदस्य जातीने हजर राहणार असून त्यामध्ये संचालक श्री महादु बापु कांदळकर, श्री कृष्णा नाथा आरणे, श्री भाऊसाहेब चांगदेव कोकाटे पा., श्री संभाजी शिवाजी तुरकणे पा., श्री देविदास विश्वनाथ जगताप, श्री विनोद गोवर्धन कोते पा., श्री मिलींद यशवंत दुनबळे, श्री तुळशिराम रावसाहेब पवार पा., श्री रविंद्र बाबु गायकवाड, श्री भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे पा., श्री इकबाल फकिरमहंमद तांबोळी, सौ. सुनंदा किसन जगताप पा., संचालिका सौ. लता मधुकर बारसे पा., संचालक श्री रंभाजी काशिनाथ गागरे आणि तज्ञ संचालक श्री भाऊसाहेब भानुदास लबडे पा. यांचा समावेश आहे.

याचबरोबर या व्यवस्थेचे कामकाज पाहणारे संस्थेचे सचिव श्री विलास गोरखनाथ वाणी पा., सह सचिव श्री बाबासाहेब शंकर अनर्थे पा. आणि सहाय्यक सह सचिव श्री संभाजी सोपान कोते पा. हे देखील उपस्थित राहणार आहेत. गुढीपाडव्याच्या या पवित्र मुहूर्तावर आयोजित केलेल्या या शिधा वाटप कार्यक्रमाचे शिर्डी शहर आणि पंचक्रोशीतून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.




१ २ ३ ४ ५ ६



# रणधुरंधर सुभेदार
# मल्हारराव होळकर

**मराठा साम्राज्याच्या इतिहासात अनेक पराक्रमी सेनानी झाले; परंतु आपल्या अद्धितीय शौर्य, दूरदृष्टी आणि राज्यकारभाराच्या कुशलतेमुळे ज्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली, त्या महान व्यक्तिमत्त्वांमध्ये मल्हारराव होळकर यांचे नाव अग्रस्थानी आहे. मराठेशाहीच्या उत्तर भारतातील विस्तारात ज्यांचा सिंहाचा वाटा आहे, असे हे रणधुरंधर योद्धे आजही भारतीय इतिहासात अभिमानाने स्मरणात ठेवले जातात. होळकरशाहीचे संस्थापक, मालव्याचे पहिले सुभेदार आणि मराठा साम्राज्याचे विश्वासू सरदार म्हणून त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.**

सन १६९३ मध्ये महाराष्ट्रातील होल या गावात मल्हारराव होळकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात शौर्य, धाडस आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाढूनही त्यांनी स्वतःच्या पराक्रमाच्या बळावर इतिहासात आपले अढळ स्थान निर्माण केले. मराठा साम्राज्याचे महान पेशवे बाजीराव (1)यांच्या काळात मल्हारराव होळकर यांना मोठी संधी मिळाली. बाजीराव पेशव्यांनी त्यांच्या शौर्याची दखल घेत त्यांना मराठा सैन्यात महत्त्वाची जबाबदारी दिली.

यानंतर जवळपास ५२ वर्षे त्यांनी रणांगण गाजवले. उत्तर भारतातील अनेक मोहिमा, लढाया आणि राज्यकारभाराच्या जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडल्या. मल्हारराव होळकर हे केवळ युद्धकौशल्यात पारंगत नव्हते, तर ते उत्तम रणनीतीकार आणि दूरदृष्टीचे राजकारणी देखील होते. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने अनेक वेळा शत्रूंवर निर्णायक विजय मिळवला.

मालवा प्रदेशात त्यांनी उभारलेली होळकरशाही ही मराठा साम्राज्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना ठरली. आजच्या मालवा प्रदेशात त्यांनी मराठा सत्तेचा मजबूत पाया घातला. पुढे होळकर घराण्याने या प्रदेशात दीर्घकाळ राज्यकारभार केला आणि इंदूरसारख्या शहराचा विकास घडवून आणला.

मल्हारराव होळकर यांच्या नावाचा धाक इतका होता की रणांगणावर "मल्हार आया" ही आरोळी ऐकली की शत्रूंच्या छावण्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असे. त्यांच्या पराक्रमाच्या कथा आजही लोकांच्या तोंडी ऐकायला मिळतात. अनेकदा शत्रू सैन्य त्यांच्या नावानेच भयभीत होऊन रणांगण सोडून पळून जात असे, अशी वर्णने इतिहासात आढळतात.

मराठा साम्राज्याचा विस्तार करताना त्यांनी उत्तर भारतातील अनेक प्रदेशांवर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली. पंजाबपासून ते राजस्थानपर्यंत आणि गंगा-यमुना दोआबापर्यंत मराठ्यांचा प्रभाव वाढवण्यात मल्हारराव होळकर यांचे मोठे योगदान होते. अटकेपार झेंडा फडकवणाऱ्या मराठा मोहिमांमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

इतकेच नव्हे तर भारताच्या राजधानीशी संबंधित असलेला रायसीना हिल परिसर एकेकाळी होळकरांच्या रियासतीचा भाग होता, असे इतिहासकार सांगतात. आज ज्या ठिकाणाहून देशाचा कारभार चालतो, त्या परिसराचा इतिहासही मराठा साम्राज्याशी जोडलेला हा आहे. ही बाब मल्हारराव होळकर यांच्या दूरदृष्टी आणि सामर्थ्याची साक्ष देते.



मल्हारराव होळकर हे केवळ युद्धातील पराक्रमी सेनानी नव्हते, तर ते न्यायप्रिय आणि लोकाभिमुख शासक देखील होते. त्यांनी आपल्या राज्यात प्रशासन व्यवस्था मजबूत केली, जनतेच्या कल्याणासाठी अनेक निर्णय घेतले आणि सामाजिक सौहार्द जपण्यावर भर दिला. त्यांच्या नेतृत्वामुळे होळकरशाहीला स्थैर्य आणि समृद्धी प्राप्त झाली.

त्यांच्या पराक्रमाचा वारसा पुढे त्यांच्या सूनबाई अहिल्याबाई होळकर यांनी अत्यंत यशस्वीपणे पुढे नेला. अहिल्याबाई होळकर यांच्या कारकीर्दीत इंदूर आणि मालवा प्रदेशाचा विकास झाला आणि अनेक मंदिरे, घाट व धर्मस्थळांची उभारणी झाली. या सर्व कार्यामागे मल्हाररावांनी घातलेला मजबूत पाया होता.

मराठा साम्राज्याच्या इतिहासात मल्हारराव होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांचा पराक्रम, त्यांची दूरदृष्टी आणि राष्ट्रनिष्ठा यामुळे ते खऱ्या अर्थाने मराठेशाहीचे "बापमाणूस" म्हणून ओळखले जातात. त्यांच्या शौर्यकथा आजही प्रेरणा देतात आणि राष्ट्रभक्तीची जाणीव जागृत करतात.

आज त्यांच्या ३३३ व्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशातून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. त्यांच्या स्मृतींना वंदन करताना आपण त्यांच्या पराक्रमातून प्रेरणा घेणे, समाजात एकता आणि शौर्याची भावना जपणे हेच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

रणधुरंधर, पराक्रमी सेनानी आणि दूरदृष्टीचे राज्यकर्ते असलेल्या श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांचे कार्य भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. त्यांच्या पराक्रमाची परंपरा आणि प्रेरणा येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरत राहील, यात शंका नाही.



**गजानन काटे**
मुख्य संपादक, दैनिक विश्वजगत
मिडिया प्रभारी, महाराष्ट्र, विदर्भ प्रभारी
ऑल इंडिया धनगर समाज महासभा
मो. 9096873185




- : अभिवादनकर्ते :-

■ महेंद्र सिंग धनगर राष्ट्रीय अध्यक्ष ■ रामविरसिंग धनगर संघटनमंत्री ■ रामचंद्र बंदिछोडे महाराष्ट्र प्रभारी
■ नारायण सागर मुंबई संयोजक ■ आसाराम पाल मुंबई अध्यक्ष ■ गजानन काटे मिडिया प्रभारी महाराष्ट्र, विदर्भ प्रभारी

ऑल इंडिया धनगर समाज महासभा